महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

3, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक 10036, मुंबई 400 001.

WWW.DVET.GOV.IN e-mail: desk18@dvet.gov.in Fax-२२६५९२३५/२२६७५६२८ Phone No. २२६२०६०४/२९३.

## -: जाहिरात :-

**सेवानिवृत्त शासकीय अधिका-यांची व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातंर्गत नामिकासुची तयार करणेबाबत.**

संचालनालयातंर्गत राबविण्यात येत असलेल्या जागतिक बँक सहाय्यित STRIVE प्रकल्प, State Apprenticeship Monitoring Cell (SAMC) व पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप द्वारे औ.प्र.संस्थांचा दर्जावाढ करणे या योजनेतंर्गत प्रकल्पाशी संबंधीत बाबींचे सनियंत्रण करण्याकरीता शासकीय सेवानिवृत्त उपसंचालक/सहा.संचालक (तां) , प्राचार्य व सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार इ.अधिका-यांची नामिका सुची तयार करावयाची आहे.

अधिक माहितीसाठी www.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध जाहिरातीचे, अर्जाचा नमुना, पदासाठी आवश्यक कर्तव्ये व जबाबदा-या तसेच अटी व शर्तीचे अवलोकन करण्यात यावे.

इच्छुक सेवानिवृत्त अधिका-यांनी दिनांक १८.०२.२०२१ पुर्वी आपले परीपुर्ण अर्ज ई-मेलद्वारे desk18@dvet.gov.in वर सादर करावेत.

| अ.क्र. | कक्ष | पदाचे नाव | पदासाठी आवश्यक पात्रता | आवश्यक अनुभव | पद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | SAMC | Deputy Director | सेवानिवृत्त उपसंचालक/ सहा.संचालक (तां)/ जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी /प्राचार्य (वर्ग-१) | कमीत कमी ७ वर्षाचा शिकाऊ उमेदवारी कायदा अंमलबजावणीचा अनुभव आवश्यक | १ |
| २ | SPMC | Institutional Development/ITI Specialist-Consultant | सेवानिवृत्त प्राचार्य/ अधिव्याख्याता / निरीक्षक (तां) | व्यवसाय प्रशिक्षण प्रकल्प/ कौशल्य विकास प्रकल्प / तंत्र शिक्षण प्रकल्प /शैक्षणिक प्रकल्प अंमलबजावणीचा कमीत कमी ५ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये/ प्रादेशिक स्तरावर किंवा राज्य स्तरावर प्रकल्प अंमलबजावणीचा अनुभव असणा-या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. | १ |
| ३ | SAMC | Consultants (Manufacturing/ Service Sector) | सेवानिवृत्त प्राचार्य/ सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार / Training cum Placement Officer | कमीत कमी ५ वर्षाचा शिकाऊ उमेदवारी कायदा अंमलबजावणीचा अनुभव आवश्यक) | १ |

या जाहिरातीद्वारे करावयाची नामिकासूची शासननिर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेंबर २०१६ मधील तरतुदीनुसार तयार करण्यात येईल.

पदनिहाय कर्तव्ये व जबाबदा-यांचा तपशील सोबत जोडला असुन याबाबत उमेदवारांचा अभ्यास व त्यांचा अनुभव याचा विचार करुन आवश्यकतेनुसार विशीष्ट कालावधीकरीता वरील शासननिर्णयानुसार नियुक्तीबाबत कार्यवाही करण्यात येईल.

या जाहिरातीद्वारे करावयाच्या नियुक्त्या करताना शासननिर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेंबर २०१६ मधील तरतुदीनुसार मासिक पारिश्रामिक देण्यात येईल. कामाचे मुख्यालय व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई राहिल.

नामिकासूचीत समाविष्ट झाल्यामुळे सेवानिवृत्त अधिका-यास काम मिळेल, याची कोणतीही हमी देण्यात येणार नाही.

स्वा/-
श्री दीपेन्द्र सिंह कुशवाह, (भा.प्र.से.)
संचालक

## State project Management Cell (SPMC) / State Project Implementation Unit (SPIU)

**Name of the Post** : **Deputy Director (1 No.)**

**Job Responsibility:**

1. Monitoring all activities of SAMC (State Apprenticeship Monitoring Cell)
2. Responsible for Management of all activities of SAMC including Industry Apprenticeship initiative component under STRIVE Project.
3. Reporting to mission Director/SAA
4. Coordinating with Gov. of India, Gov. of Maharashtra, Industry Clusters/ Associations and Industries.
5. Coordinating with all stake holders involved in implementation of Apprenticeship Training Scheme at Different Stages.
6. Guiding to Consultants in SAMC
7. Guiding to BTRI Centres, Industries, Industry Clusters/Associations
8. Submission of Various period reports to Govt. of India
9. Any other activities as deemed fit and as per the mission Director/SAA

# State project Management Cell (SPMC) / State Project Implementation Unit (SPIU)

**Name of Post :- Institutional Development/ ITI Specialist- Consultant** (1 No.)

**Job Responsibility :-** The Institutional Development / ITI Specialist is expected to assist the SPIU in the delivery of the following duties:

1. Raising stakeholders' awareness of the project objectives and eligibility criteria for financing.
2. Contributing to the work plans of the SPIU.
3. Evaluating ISPs and providing written advice on them to the SSC.
4. Undertaking quality audits of institutions participating in the project.
5. Conducting orientation of project for Institute Management Committee (IMC) (or equivalent) and Industry Cluster (IC) members.
6. Identifying training needs in a participatory way and preparing plans for meeting the training needs of ITIs' principals and instructors, and IC managers and trainers.
7. To inspect Industrial Training Institute (Technical Inspection)
8. To ensure that the scheme of short term courses operating in the project is relevant to the Present and future needs of Industries.
9. Monitoring & Implementation of short term courses designed by sector skill council/ SCVT/NCVT
10. Liaise with DGT, Regional Office & ITIs, Maharashtra State Skill Development Society (MSSDS), Industry Associations regarding project
11. Submission of Quarterly and yearly Reports to DGT
12. Monitoring the implementation of the project on a day-to-day basis.
13. Implementing and overseeing procedures for the regular monitoring of performance of institutions participating in the project. This will include procedures for assisting with ad hoc surveys (such a tracer studies and surveys of employers' attitudes).
14. Undertaking regular field visits in order to monitor institutions using a simple checklist and consolidate quarterly monitoring reports based on the checklists. Propose any corrective action that needs to be taken.
15. Ensure that KPI of project are achieved.

15. All project related works.

# State Apprenticeship Monitoring Cell (SAMC)

**Name of Post :- Consultants (Manufacturing/Service Sector)** (1 No.)

**Job Responsibility :-**

1. Coordinate/establish liaison with establishments under the manufacturing / service sector
2. Coordinate/establish liaison with Industry clusters/Associations
3. Coordinate/establish liaison with ITIs/school/college education system, district administrations for promoting apprenticeship training
4. Sensitizing industries on apprenticeship training procedures
5. Provide inputs to IT and communication consultant of SAMC for formulating effective reporting
6. Provide short-term training/ capacity building support to Basic Training Providers (BTPs)/ Third Party Agencies (TPAs), etc. as required
7. Submission of Quarterly and yearly Reports to DGT
8. Monitoring the implementation of the project on a day-to-day basis.
9. Monitoring the implementation of Industry Apprenticeship plan submitted by Industry association / Clusters
10. Achieve the targets of project set by DGT/ State.
11. Inspection of Training facilities at basic training providers, establishments, Industry Associations, Industry Clusters.
12. Liaise with DGT, Regional Office & basic training providers, establishments, Industry Associations, Industry Clusters regarding project
13. Implementing and overseeing procedures for the regular monitoring of performance of Industry Clusters and basic training providers participating in the project.
14. Monitoring of the Apprenticeship training through Apprenticeship portal and solve the queries raised by project implementation agencies. e.g. Establishments, Asstt. Apprenticeship Advisor and Industry Association.
15. All project related works.

# नामिका सूचीतील सेवानिवृत्त अधिका-यांसाठी अटी व शर्ती :-

१. विवक्षीत कामाचे स्वरुन आणि व्याप्ती विचारात घेऊन ते काम पुर्ण करण्याचा कालावधी निश्चीत करुन सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षाकरीता देण्यात येईल व आवश्यकता असल्यास नियुक्तीचे वाढीव कालावधीकरीता नुतनीकरण करण्यात येईल. परंतु असा एकुण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही किंवा प्रकल्पाची मुदत संपेपर्यत असेल. सदर कराराचा कालावधी एक वर्षाचा असेल. वर्षभरात केलेल्या कामकाजाचा संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचेकडुन वार्षीक आढावा घेतल्यानंतर कामाची व्याप्ती लक्षात घेऊन वाढीव कालावधीकरीता कराराचे नुतनीकरण करण्यात येईल.

२. सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना सामान्य प्रशासन विभाग, शासननिर्णय क्र. संकीर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/ १३ दिनांक १७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार मासिक पारिश्रामिक अनुज्ञेय राहिल.

३. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतांस शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावुन घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/ हक्क नसेल.

४. करार पध्दतीने नियुक्ती करताना कमाल वयोमर्यादा हि ६५ वर्षापेक्षा अधिक नसेल.

५. असा सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी शारीरीक, मानसीक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असलेबाबत तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असल्याबाबत खातरजमा करण्यात येईल.

६. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षीत काम पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तींची राहील व तसे बंधपत्र/ हमीपत्र त्यांच्याकडुन घेण्यात येईल. तसेच सदर बंधपत्रात/ हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने या निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चीत केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती, करार पध्दतीवरील उमेदवारांकडुन नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, या समावेश करुन सदर अटी व शर्ती मान्य असल्याचा उल्लेख करण्यात येईल.

७. अशा अधिका-याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसल्याबाबत खातरजमा करण्यात येईल.

८. नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थीतीत कोणत्याही वेळी अशा अधिकारी/ कर्मचारी यांच्या करार पध्दतीवर सेवा समाप्त करण्याचा अधिकार राहील.

९. असा अधिकारी यांनी Conflict of Interest जाहीर करणे आवश्यक राहील.

१०. अशा अधिका-यांना / कर्मचा-यांना शासकीय वाहन अनुज्ञेय / उपलब्ध असणार नाही. तसेच अशा अधिकारी/ कर्मचारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्ती वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहिल.

११. अशा करार पध्दतीवरील अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहिल.

१२. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेले अधिकारी/ कर्मचारी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे नियंत्रणाखाली कार्यरत असतील.

१३. नियुक्त करण्यात आलेले अधिकारी/ कर्मचारी यांना त्यांचेवर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

१४. अशा अधिकारी/ कर्मचारी यांनी तयार केलेले अहवाल / प्रस्ताव पर्यवेक्षीय अधिका-यामार्फत संचालकांच्या मान्यतेअंती शासनास सादर करता येतील.

१५. करार पध्दतीने घेण्यात आलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना सोपविण्यात येणारे कामाचे स्वरुप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे अंतिम निर्णयाने ठरेल.

१६. करार पध्दतीने घेण्यात आलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांची बैठक व्यवस्था उपलब्ध असलेल्या जागेनुसार करण्यात येईल.

१७. अशा अधिकारी/ कर्मचारी यांना सामान्य प्रशासन विभाग शासननिर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेंबर २०१६ मधील अटी व शर्ती लागु राहतील.

१८. जागतिक बँक प्रकल्प / पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशीप (पीपीपी) च्या कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

# अर्जाचा नमुना

निवृत्त राज्य शासकीय अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरीता अर्ज

**पदाचे नाव :-**

उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे.

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव :

२. अर्जदाराचा पत्ता :

३. सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम व वेतनश्रेणी :

४. भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी :

५. जन्मदिनांक व वय :

६. शिक्षण :

७. अनुभवाचा सविस्तर तपशिल : (पदनाम, कालावधी व अनुभवाचा तपशील नमुद करावा)

८. विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय ? : होय / नाही

विवक्षीत प्रकारचे कामकाज पार पाडण्यासाठी करार पध्दतीने नियुक्तीने जाहिरात / सूचना मी काळजीपूर्वक वाचली असुन सुचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी